पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाग्रशा/ स्वयंअशाळा/११३३/१६
पुणे १ दिनांक :- ३/१०/२०१६
४/१०/२०१६

प्रति,

अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,
श्रीनाथ म्हस्कोबा शैक्षणिक संस्था, पिलणवाडी, राहू, ता.दौंड संचलित कदम पाटील इंग्लिश मिडीयम स्कुल,
मु. पिलणवाडी, राहू, ता. दौंड, जि. पुणे

विषय:- सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

संदर्भ:- १) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र १,६ व २४) २०१२
२) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र. नाहप्र-२००९/(६६३/०९) माशि-१, दि. २० जून २०१२.
३) शासन निर्णय एसएफएस-१०१४/प्र.क्र.१७०/एसएम-२,शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई, दि. ०२.०६.२०१५
४) मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचा मान्यता आदेश क्र. शिउसं//प्राथ-२/स्वयंशाळा/मान्यता/पुवि/२०१५/११६३४, दि. ३० जून २०१६

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर **नवीन शाळा स्थापना** करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. १ च्या पत्रानुसार **नविन शाळा स्थापन करणेकरिता खालील अटी व शर्तीवर प्रथम मान्यता देण्यात येत आहे.**

अ.क्र.	संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता	मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता	माध्यम	शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ	मान्यता वर्ग / इयत्ता	शेरा
१	३	४	५	६	७	९
१	श्रीनाथ म्हस्कोबा शैक्षणिक संस्था, पिलणवाडी, राहू, ता.दौंड, जि. पुणे	कदम पाटील इंग्लिश मिडीयम स्कुल, मु. पिलणवाडी, राहू, ता. दौंड, जि. पुणे	इंग्रजी	नवीन शाळा	प्राथमिक १ ते ४	स्वयंअर्थ सहाय्यित सन २०१५-१६

अटी व शर्ती

१. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
२. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
३. या अधिनियमातील तरतुदीनूसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.
४. संदर्भ क्रमांक ०४ अन्वये सन २०१५-१६ मध्ये परवानगी देण्यात येत आहे.
५. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.

७. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.

८. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

९. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना **UDISE** मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा/ वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

प्रत माहितीसाठी सविनय सादर-

१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा. शिक्षण संचालक(माध्य.व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.
३. मा. शिक्षण संचालक(प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.
४. मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-०१
५. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती दौंड.

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ स्वयंअशाळा/६०/१८
पुणे १ दिनांक :- ~~/१०/२०१८~~ 19/1/2019

प्रति,

अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,
श्रीनाथ म्हस्कोबा शैक्षणिक संस्था संचालित कदमपाटील इंग्लिश मिडीयम स्कूल पिलाणवाडी ता दौड जिल्हा पुणे

विषय:- सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

संदर्भ संदर्भ :- १. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र १, ६ व २४) २०१३
२.शासन निर्णक एसएफएस १०१८ / प्रक्र १११४ एसएम दिनांक २८/९/२०१८
३. मा.शिक्षण उपसंचालक, पुणे यांचेकडील शिउस / स्वयंशाळा मान्यता पुवी २०१८-१९ /७२७२ दिनांक ८/१०/२०१८

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने नविन शाळा करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. २ च्या निर्णयानुसार **खालील अटी व शर्तींवर विद्यमान प्राथमिक शाळेस जोडून उच्चप्राथमिक इ ६ वी ते ८ वी प्रथम मान्यता देण्यात येत आहे .**

अ.क्र.	संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता	मान्यता मिळालेल्या शाळेचे नोव व पुर्ण पत्ता	माध्यम	शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ	मान्यता वर्ग / इयत्ता	शेरा
१	३	४	५	६	७	९
१	**श्रीनाथ म्हस्कोबा शैक्षणिक संस्था पिलाणवाडी ता दौड जिल्हा पुणे**	**कदमपाटील इंग्लिश मिडीयम स्कूल पिलाणवाडी ता दौड जिल्हा पुणे**	इंग्रजी	नविन शाळा (राज्यमंडळ) स्वंयअर्थसहाय्यित तत्वावर	प्राथमिकला जोडून ते उच्च प्राथमिक इ .६ वी ते इ.८ वी	२०१८-१९

अटी व शर्ती

१३ संस्थेने वर्ग परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

१४ शासनाने ज्या ठिकाणासाठी नविन शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी वर्ग सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

१५ या अधिनियमातील तरतुदीनूसार वर्ग करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.

१६ संदर्भ क्रमांक ०२ अन्वयेसन २०१८-१९ मध्ये नविन शाळा परवानगी देण्यात येत आहे.

१७ परवानगी मिळाल्या पासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

१८ परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.

७ शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.

८ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

९ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना**UDISE** मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

१० शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

प्रत माहितीसाठी सविनय सादर-
१)मा. अवर सचिव, शालेय शिक्षणवक्रीडाविभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२)मा. शिक्षण संचालक(माध्य.व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१
३)मा. शिक्षण संचालक(प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१

माध्यम :- इंग्रजी
स्वंयअर्थ सहाय्यित शाळा

पुणे जिल्हा परिषद,पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग माध्यमिक
जा.क्र.शिक्षण/माध्य/ना.स्प/ 1870 /२०२०
पुणे दिनांक :- 3/6/2020

प्रति,
अध्यक्ष/सचिव
श्रीनाथ म्हस्कोबा शैक्षणिक संस्था,
पिलाणवाडी ता.दौंड जि.पुणे

विषय :- सन २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट् स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नविन शाळा स्थापन करणे,तसेच विदयमान शाळेचा दर्जावाढ साठी जून २०१९ पासून इ.९ वी व १० वी च्या इंग्रजी माध्यम वर्गास प्रथम मान्यता देण्याबाबत.

संदर्भ :- १. शालेय शिक्षण विभाग मुंबई कडील शासन निर्णय क्रं.सीबीई-१०१४/प्र.क्र५८/एसएम-२ दि.३/३/२०१४
२. अध्यक्ष/सचिव म्हस्कोबा शैक्षणिक संस्था पिलारवाडी ता.दौंड जि.पुणे

वरिल संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१,३.२,३.३ अन्वये श्रीनाथ म्हस्कोबा शैक्षणिक संस्था,पिलाणवाडी ता.दौंड जि.पुणे या माध्यमिक शाळेच्या इंग्रजी माध्यम वर्गाला संदर्भीय पत्र क्र. २ नुसार महाराष्ट् स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नविन शाळा स्थापन करणे,तसेच विदयमान शाळेचा दर्जावाढ परवानगी देण्यात आलेली आहे. संदर्भ क्र. २ अन्वये इ.९ वी व १० वी च्या वर्गासाठी नैसर्गीक वाढीने जून २०१९-०२० या शैक्षणिक वर्षापासून जून २०१९ पासून इ.९ वी व १० वी च्या इंग्रजी माध्यम वर्गास प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

१.प्रस्तूत प्रकरणी बालकांचा मोफत व स्क्तीच्या शिक्षणांचा हक्क अधिनियम २००९ मधिल तरतूदीचे उल्लघंन होणार नाही याची दक्षता ध्यावी.
२. नविन वर्गांना कायम विनाअनुदान तत्वावर प्रथम मान्यता देण्यात आलेली असून भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.
३. माध्यमिक शाळा संहिता नियम क्र.३(२) ,४८ तसेच ८३ मधिल सर्व तरतूदीचे काटेकोरपणे पालन करावे.
४. विहीत निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ती करावी.
५. संच निश्चीती व कर्मचारी मान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी.
६. शैक्षणिक शुल्क विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन आकारण्यात यावी.
७. विहीत संख्येच्या मर्यादित विदयार्थ्यांना प्रवेश दयावेत.
८. शासनाचे वेळोवेळी दिलेले आदेश सूचना यांचे पालन करणे बंधनकारक राहिल.
९. सदरची प्रथम मान्यता हि तात्पुरत्या स्वरुपाची असून पाच वर्षांच्या कालावधीनंतर कायमपणे मान्यता देण्याचा या कार्यालयाकडून विचार करण्यात येईल. मात्र शाळेने संस्थेने माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३ मध्ये घालून दिलेल्या शर्ती पूर्ण करणे चालू ठेवले पाहिजे.
१०.संस्थेने शाळा परवानगी साठी विहीत केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.
११.शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली ओ. त्या ठिकाणी व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रदद् समजण्यात येईल.
१२. अधिनियमातील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०१९-०२० पासून असेल.
१३. शैक्षणिक वर्ष २०१९-०२० मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गा व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत.
१४.परवानगी देण्यात आलेल्या नविन शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे कार्यपध्दतीने

तसेच बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट् स्वंय अर्थसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन) मुख्य.अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील.

१५.शाळा इमारतीच्या दर्शनीभागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वंय अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नविन शाळा/दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.

१६.महाराष्ट् स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या नियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना U DISE मध्ये माहिती भरताना स्वंय अर्थसहाय्यित शाळा/वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

इतर अटी :- जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्य मा.सर्वोच्य न्यायालयाने दिनांक १४/४/२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

१. शाळामध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशामन यंत्रणा बसविण्यात यावी.
२. शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत.
३. शाळेच्या संबधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.
४. सदर शाळेची इमारत सर्व दूष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देण्यापूर्व करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदार शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, याची राहील.
५. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षितेच्या दृष्टीने निमित तपासणी करण्यात यावी,संबधित अधिकारी यांनी त्यांचे काटकोरपणे पालन करावे वरील काम जे अधिकारी/कर्मचारी करणार नाही त्यांचेवर कडक शिस्तभगाचा कारवाइ करण्यात यावी.
६. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९,महाराष्ट् बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणचा हक्क नियम २०११ तसेच ज्या मंडळाशी शाळा संलग्नित होणार आहे. त्या मंडळाने विहित कलले निकष,शर्ती,अटी यांच्या पूर्ततेसह शाळेस इमारत व भौतिक सुधारणा करणे बंधनकारक राहील.
७. महाराष्ट् शैक्षणिक संस्था (शुल्क विनियम) २००९ व नियम २०१६ चे पालन करणे आवश्यक आहे.

वारल निधारित कलेल्या शर्तीचे व वेळोवेळी निर्धारित करण्यात येतील. अशा शर्तीची पूर्तता करण्याच्या अधिन राहून आणि समाधानकारक कामकाजाच्या अधिन राहून शाळेची मान्यता चालू ठेवता येईल. परंतु प्रतिसाद न मिळालेस शाळेची मान्यता काढून घेतली जाईल याची नोंद घ्यावी.

06.05.20

(डॉ.गणपत मोरे)
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद,पुणे

प्रत :- माहिती व कार्यवाहीसाठी
१.मुख्याध्यापक
२.विभागीय सचिव,पुणे विभागीय शिक्षण मंडळ शिवाजीनगर पुणे

प्रत :- माहितीस्तंव सविनय सादर.
१. मा.अवर सचिव (शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय विस्तार भवन मुंबई ३२
२. मा. उपसंचालक पुणे विभाग पुणे